जंगम समाज : समाजशास्त्रीय विश्लेषण
(विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा नांदेड अंतर्गत सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील समाजशास्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीच्या अंशत: पुर्ततेसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

-: संशोधक :-

साखरे मनोज चंद्रकांत

-: मार्गदर्शक :-

डॉ.सिध्देश्वर रा.शेटकर

समाजशास्त्र विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक,

संजीवनी महाविद्यालय, चापोली

ता.चाकूर जि.लातूर

-: संशोधन केंद्र :-

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

मार्च - २०१६

जंगम समाज : समाजशास्त्रीय विश्लेषण (विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा)

✦ प्रस्तावना :-

भारतात पूर्वी व आजही एक विशिष्ट प्रकारची सामाजिक श्रेणीरचना आढळते तिला जाती असे म्हणतात. विवाह व कुंटुंब यांच्याप्रमाणे जात ही भारतीय समाजातील एक महत्वाची संस्था आहे. भारतातील जातिसंस्था ही अगदी पूर्णत्वाला वा पराकोटीला गेलेली आहे हे तिचे खास वैशिष्ट्ये होय. भारतीय समाजाच्या सर्व अंगावर जातिचा प्रभाव पडलेला दिसून येतो. भारतीय समाजाची उभारणी जातिव्यवस्थेवर झाली आहे. जातिव्यवस्था ही या समाजाचा पाया आहे.

प्राचीन काळात हिंदु समाज ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णांत विभागला गेला. यातील प्रत्येक वर्णाची सामाजिक जीवनशैली निर्धारित करण्यात आली, ही जीवनशैली निर्धारित करत असताना ती नियमांद्वारे करण्यात आली आणि यातून वर्णव्यवस्था उदयास आली. सुरवातीच्या काळात व्यक्तीचा वर्ण हा त्याच्या गुणकर्मावरुन अथवा कौशल्यावरुन निर्धारित होत असे; पण पुढे मात्र व्यक्तीचा वर्ण हा त्याच्या जन्मावरुन ठरवण्यात येवू लागला. अशा प्रकारे व्यक्तीला वर्ण बदण्यास प्रतिबंध केला गेला. सामाजिक परिवर्तनाच्या प्रवाहामध्ये अनेक बदल घडून आले. त्यापैकी एक म्हणजे लोकसंख्येतील वाढ लोकसंख्या वाढल्यामुळे लोकांच्या गरजा वाढल्या त्यामुळे अनेक नवीन व्यवसाय उदयास आले. या घटकामुळे प्रत्येक वर्णांतर्गत अनेक समुह व उपसमुह उदयास आले. या समुहांना व उपसमुहांनाच जाती व उपजाती अशी नावे दिली गेली. निरनिराळ्या जातीतील व उपजातीतील परस्परसंबंध व प्रत्येक जातीची जीवनशैली नियमित करण्यासाठी अनेक सामाजिक नियमने तयार करण्यात आली व अशाप्रकारे जातिसंस्था उदयास आली. अशा या जातीसंस्थेचा भारतीय समाजावर खुप मोठा प्रभाव पडला व आजसुध्दा हा प्रभाव ब-याच प्रमाणात टिकून आहे. या जातीसंस्थेनुसार भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व इतर संस्थांचे स्वरुप ठरत असते त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेत जातीसंस्था ही सामाजिक संस्थेचा अविभाज्य घटक आहे.

समाजातील व्यक्तीचे जीवन हे पुर्णपणे जातिसंस्थेने निर्धारित केले आहे. यामुळे सामाजिक शास्त्रातील समाजशास्त्र या विषयामध्ये एखादे संशोधन कार्य पार पडत असताना एखाद्या जाती समुहावरती संशोधन करणे उचित ठरणार नाही आणि म्हणून मी वीरशैव पंथातील 'जंगम' या जातिची निवड करुन "जंगम समाज : समाजशास्त्रीय विश्लेषण" हा विषय संशोधन कार्यासाठी निवडला आहे.

✦ संशोधन विषयाची निवड :-

सामाजिक कल्याण हे भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेचे एक महत्वपूर्ण उद्दिष्ट मानले जाते. म्हणुन

स्वांत्र्यप्राप्तीनंतर भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली. म्हणजेच सामाजिक कल्याण साध्य करणे हे राज्याचे एक महत्वाचे उद्दिष्ट मानले आहे. त्यामुळे अनुसूचित जाती आणि जमाती, महिला व मुले तसेच इतर मागासवर्ग यासारख्या मागास घटकांची उन्नती करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या तरतुदी भारतीय राज्यघटनेत केल्या आहेत. या तरतुदीनुसार सामाजिक कल्याणाचे अनेक कार्यक्रम व योजना यांची अंमलबजावणी सरकारने केली आहे. तथापि भारतीय समाजातील काही जाती, जमाती, महिला या योजनांच्या व कार्यक्रमांच्या लाभापासून वंचित आहेत, लाभ होत असेल तर त्यांच्यामध्ये अपेक्षित बदल घडून येत आहेत का ? याचा संशोधन पातळीवरती अभ्यास करणे अगत्याचे ठरते. भटका, भिक्षुकी आणि अल्पसंख्या असणारा जंगम समाज आहे. जो की सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत उपेक्षित व दुर्लक्षित राहिलेला आहे. जंगम समाजाच्या पोटजातीवरती तसेच जंगम समाजाच्या एका विशिष्ट म्हणजेच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय किंवा भौगोलिक या प्रत्येक अंगाभोवती स्वतंत्र संशोधन कार्य पार पाडण्यात आले आहे. त्यामुळे या समाजाची वास्तव स्थिती समजू शकत नाही. या कारणास्तव व्यापक दृष्टिकोनातून अभ्यास होणे गरजेचे आहे. उपेक्षित जंगम समाजाचे सर्वंकक्ष चिकित्सक अध्ययन करण्यासाठी ‘‘जंगम समाज - समाजशास्त्रीय विश्लेषण’’ हा संशोधनाचा विषय निवडला आहे.

✦ संशोधन विषयाचे महत्व :-

जंगम ही शैव संप्रदाय स्वीकारलेल्या भटक्या भिक्षेक-यांची जात आहे. लिंगायत पंथ स्वीकारलेल्या लोकांचे पौराहित्य कार्य जंगम समाजाच्या व्यक्तीकडून पार पाडले जाते. आणि म्हणुनच वीरशैव पंथामध्ये जंगम समाजाला गुरुवर्गीय मानण्यात आले आहे. जंगम समाज हा वीरशैव पंथ प्रचारातील महत्वाची व्यक्ती आहे. जंगम समाजाने समाजामध्ये प्रबोधनाचे कार्य करुन समग्र मानव जातीला अज्ञानाच्या अंधकाराकडुन सुज्ञानाच्या प्रकाशाकडे नेले आहे.

जंगम म्हणजे व्यक्ती नव्हे, जंगम हे एक तत्व आहे, जंगम हा एक समाज आहे. समाजाची सेवा करण्यात मग्न असलेला जंगम होय. समाजाच्या कल्याणासाठी परिश्रम घेणारा, जनसामान्यांचे मन परिवर्तन करणारा, सद्‌बोध करणारा, समाजाचे शुध्दिकरण करणाराच जंगम होय अशी जंगम समाजाची ओळख श्री ईरय्या किल्लेदार यांनी त्यांच्या लिखानात सांगितली आहे.

आज एकविसाव्या शतकाच्या परिवर्तनाच्या प्रवाहामध्ये ग्रामीण तसेच शहरी भागात जंगम समाज केवळ धार्मिक दृष्टिकोनातुन प्रतिष्ठीत तसेच श्रेष्ठ म्हणून ओळखला जातो. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या या समाजात कमालीचे मागसलेपण आढळून येते. आज देखील पारंपरिक प्रथा परंपरेनुसार व्यक्तीच्या सामाजिक जीवनाचे निर्धारण या समाजात केले जाते. वरवर पाहता हा समाज सुधारलेला व पुढारलेला

दिसून येत असला तरी या समाजात अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच शैक्षणिक समस्या आढळून येतात.

जंगम समाजावर विविध साहित्य, मासिके व वृत्तपत्र यांच्या माध्यमातुन लिखाण करण्यात आले आहे. पण हे लिखाण एका विशिष्ट चौकटीमध्ये बंदिस्त करण्यात आले आहे. म्हणजेच जंगम समाजाची धार्मिक बाजू मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जंगम समाजाचा सर्वांगीन दृष्टीकोनातून अभ्यास झालेला दिसुन येत नाही म्हणुन या विषयावर अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली. या संशोधन अभ्यासाच्या अनुषंगाने जंगम समाजाची वास्तव स्थिती मांडण्याची संधी मला मिळत आहे. या संशोधन कार्यातुन शासनाला जंगम समाजाविषयी एखादे धोरण ठरवत असताना तसेच एखाद्या कार्यक्रमाची अमलबजावणी करत असताना निश्चित सहकार्य मिळू शकते. त्यामुळे जंगम समाजाच्या सर्वांगीण विकासाची दिशा निश्चित करता येवू शकते.

✦ साहित्याचे सिंहावलोकन :-

संशोधनात संकल्पनात्मक चौकटीला महत्व असल्याने प्रस्तुत संशोधन विषयाचे धर्माचे समाजशास्त्र, ग्रामीण समाजशास्त्र व विकासाचे समाजशास्त्र अशा बहुशास्त्रीय सिंध्दातातील संकल्पनेच्या परिप्रेक्ष्यातून संशोधन कार्य पार पाडले जाणार आहे.

जंगम समाज हा वीरशैव पंथातील एक प्रमुख घटक असल्यामुळे वीरशैव पंथातील साहित्यामध्येच जंगम समाजाचा उल्लेख आढळतो. जंगम समाजाशी निगडीत असे स्वतंत्र लिखाणाचा अभाव दिसुन येतो. त्यामुळे पुढील साहित्य संशोधनाचा आढावा वीरशैव पंथाच्या साहित्यकृतीतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रत्येक कालखंडात धर्मानेच संपूर्ण समाजजीवन प्रभावीत झालेले आपणास दिसुन येते. त्यामुळेच धर्म हा प्रत्येक कालखंडातील विचारवंताच्या अभ्यासाचा व चिंतनाचा विषय बनला आहे. एकोणिसाव्या शतकात ऑगस्ट कॉम्त, एडवर्ड टायलर, हर्बर्ड स्पेन्सर यंनी समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून धर्माच्या विविध पैलूंवर विचार मांडले. याच कालखंडात वैज्ञानिक पध्दतीबरोबरच विकासवादी आणि मानसशास्त्रीय पध्दतीचा वापर करुन धर्माचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न झाला. विसाव्या शतकात एमील डरखाईम, मॅक्स वेबर आणि टॉल्कॉट पार्सन या समाजशास्त्रज्ञांनी धर्माच्या विविध पैलूंचा समाजशास्त्रीय अभ्यास केलेला आहे. प्रामुख्याने धर्माच्या प्रकार्यात्मक भूमिकेसंबंधी आणि सामाजिक संघटन व एकात्मतेच्या दृष्टीने या विचारवंतांनी त्यांचे विचार मांडले आहेत.

भारतीय समाजाची उभारणी ही जातीव्यवस्थेवर आधारलेली असल्याने भारतीय समाजाची एक प्रभावी संस्था या नात्याने जातिसंस्थेच्या संरचनात्मक, कार्यात्मक, राजकीय व धार्मिक अशा वेगवेगळ्या दृष्टीकोनातून समाजशास्त्रज्ञांनी अभ्यास करण्यास सुरुवात केली. जातीनिष्ठ समाजव्यवस्थेवर अध्ययन करणा-या भारतीय

समाजशास्त्रज्ञांमध्ये डॉ.एम.एन. श्रीनिवास यांचा विशेष उल्लेख केला जातो. त्यांनी Religion and Society among the coorgs of South India, 1962 या साहित्य कृतीची निर्मिती करुन संरचनात्मक - कार्यवादी दृष्टीकोणाच्या आधारावर भारतातील ग्रामीण समाजात अस्तित्वात असलेल्या जातिव्यवस्थेत झालेल्या बदलाचे विश्लेषण केले. आंद्रे बेताई यांनी १९६६ साली Caste, Class and Power हा ग्रंथ प्रकाशित केला. या अध्ययनात त्यांनी ग्रामीण समाजव्यवस्थेतील राजकीय सत्तास्पर्धेत जातिव्यवस्थेचा राजकारणी लोक कसा वापर करुन घेतात त्याचे विवेचन केले. ल्युई ड्युमाँ यांनी १९७० साली Homo Hierarchicus हा ग्रंथ प्रकाशित केला व जातिव्यवस्थेची वास्तवता विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधनासाठी निवडलेल्या जंगम समाजाचे विवेचन हे शैव संप्रदायातील ग्रंथामध्ये प्रामुख्याने आढळुन येते. ग्रँट डफ या तज्ञांच्या मते, जंगम हा खेड्यातल्या चोवीस सेवा देणा-या जातिपैकी एक आहे. त्री.ना. अत्रे यांनी त्यांच्या गाव-गाडा या ग्रंथामध्ये जंगम हे बलुतेदार-अलुतेदार व फिरस्ते असल्याचा उल्लेख केलेला आहे. वीरशैवीझम इन इंडिया या ग्रंथामध्ये डॉ.घुगरे एस.बी. यांनी जंगम ही परिभाषा स्पष्ट करताना असे विवेचन केले की, जंगम शब्दाचा शब्दशः अर्थ स्थिर, स्थायी, एकाच ठिकाणी स्थित, कायम नसणारा म्हणजेच सतत अस्थिर अस्थायी, चल असणारा किंवा एका ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी सतत भ्रमण करणारा होय. के.एस. सिंग यांच्या मते वीरशैवामध्ये वंशपरंपरागत पौरोहित्य आढळते जे की, अस्थिर, फिरत्या पुरोहितांकहुन केले जाते. या पुरोहितांना जंगम असे म्हटले जाते. डॉ.घुगरे एस.बी., डॉ.एस.जी. देवगावकर, डॉ.के.एस. सिंघ यांनी अनुक्रमे वरीशैवीझम इन इंडिया, महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती, पिपल ऑफ इंडिया या ग्रंथामध्ये जंगम जमातीची लक्षणे मांडली आहेत. डॉ.घुगरे एस.बी. यांनी वीरशैव व इतर धर्म आणि समाज या ग्रंथामध्ये जंगमांचे प्रकार सांगितले आहेत. पहिला प्रकार म्हणजे स्थिर जंगम आणि दुसरा म्हणजे चर जंगम होय.

✦ संशोधनाविषयाची उद्दिष्टे :-

जंगम समाज : समाजशास्त्रीय विश्लेषण या विषयाचा अभ्यास करत असताना समाजशास्त्रीय घटक महत्वाचे मानून प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत.

१) वीरशैव पंथ व जंगम समाज यांचा परस्परसंबंध अभ्यासणे.

२) जंगम समाजाच्या धार्मिक अंगाची बाजू स्पष्ट करणे.

३) जंगम समाजाच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

४) जंगम समाजात असलेल्या राजकीय जागृतीच्या संदर्भात वाच्यता करणे.

५) जंगम समाजाची समस्या जाणून घेणे व उपाय सुचविणे.

✦ **संशोधन विषयाची गृहितके :-**

१) जंगम समाजामध्ये परंपरागत चालत आलेल्या रुढी, प्रथांना जास्त महत्व दिले जाते.

२) एका पिढीकडुन दुस-या पिढीला पौराहित्य कार्य पार पाडण्याची जबाबदारी हस्तांतरित केली जाते.

३) जंगम समाजामध्ये सामाजिक व आर्थिक स्थिती अंत्यत बिकट आहे.

४) जंगम समाजामध्ये शैक्षणिक जागृतीचा अभाव दिसुन येतो.

५) जंगम समाजाचा राजकीय क्षेत्रात सहभाव अंत्यत कमी आहे.

६) आधुनिकरण या सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळे समस्यारुपी आव्हाने जंगम समाजासमोर उभी टाकली आहेत.

✦ **संशोधनाची व्याप्ती :-**

क्षेत्र व्याप्ती	:-	प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा विचार करण्यात येणार आहे.
आशय व्याप्ती	:-	प्रस्तुत संशोधनात जंगम समाजाचा विचार करण्यात येणार आहे.
घटक व्याप्ती	:-	प्रस्तुत संशोधनात जंगम समाजाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व धार्मिक या अंगाचा विचार करण्यात येणार आहे.

✦ **संशोधन पध्दती :-**

कुठल्याही संशोधनापर विषयाचे अध्ययन करत असताना संशोधनाची दिशा ठरवणे महत्वाचे असते. आणि त्यासाठी संशोधन पध्दतीची आवश्यकता असते कारण कोणतेही संशोधन हे संशोधन पध्दतीशिवाय अपुरे असते. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयासाठी वर्णनात्मक व निदानात्मक आराखड्याचा अवलंब करण्यात येईल.

✦ **नमुना निवड :-**

नांदेड जिल्हा हे प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र आहे. त्यामुळे सदरील संशोधनामध्ये नांदेड जिल्ह्यातल्या सोळा तालुक्याअंतर्गत येणा-या गावांची निवड करण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यातील इतर तालुक्याच्या तुलनेत किनवट, हदगाव व मुखेड ही तालुके मोठी आहेत. त्यामुळे या तालुक्यातुन प्रत्येकी २० जंगम कुंटुंबाची निवड केली जाणार आहे व उर्वरित १३ तालुक्यामधुन प्रत्येकी १८ जंगम कुंटुंबाची निवड केली जाणार आहे. अशाप्रकारे संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील एकूण ३०० जंगम कुंटुंबाची नमुना निवड केली जाणार आहे.

✦ तथ्य संकलनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी खालील प्रकारांचा अवलंब करण्यात येईल.

प्राथमिक तथ्य :- मुलाखत, अनुसूची, प्रश्नावली व निरीक्षण.

दुय्यम तथ्य :- शासकीय, निमशासकीय, प्रकाशित, अप्रकाशित विविध संशोधनपर अहवाल, लेख, मासिके, वृत्तपत्रे, पुस्तके इत्यादी.

✦ माहिती संकलन आणि विश्लेषण :-

माहिती संकलीत करीत असतांना प्राथमिक तसेच दुय्यम स्वरुपाच्या तथ्याचा उपयोग केला जाणार आहे. प्राथमिक व दुय्यम तथ्ये संकलीत केल्यानंतर विस्तृत तथ्यांचे विश्लेषणासाठी विविध तंत्राचा अवलंब करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने तालिका, आलेख, शेकडेवारी, मध्यांक, बहुलक या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब केला जाईल व या विश्लेषणाच्या आधारे निष्कर्ष काढण्यात येतील. तसेच ''जंगम समाज : समाजशास्त्रीय विश्लेषण'' या विषयावर पुढील प्रकरणाच्या माध्यमातून संशोधन करण्यात येणार आहे.

✦ प्रकरणनिहाय योजना :-

प्रकरण १ :- प्रस्तावना

प्रकरण २ :- संशोधन पध्दती व साहित्याचे सिंहावलोकन

प्रकरण ३ :- वैवाहिक व कौटुंबीक जीवन

प्रकरण ४ :- धार्मिक जीवन

प्रकरण ५ :- सामाजिक व आर्थिक जीवन

प्रकरण ६ :- राजकीय स्थिती

प्रकरण ७ :- समाजाच्या समस्या व उपाययोजना

प्रकरण ८ :- निष्कर्ष

✦ संदर्भ ग्रंथसूची :-

१) Bryman A. (2012). Social Research methods. Oxford. Oxford University Press.

२) Ghugare S.B. (1995). Virasaivism in India. Kolhapur, Sadhana Book Stall.

३) Nagla B.K. (2013). Indian Sociological Thought.

Jaipur Rawat Publication.

४) Rawat H.K. (2007). Sociology Basic Concepts. Jaipur Rawat Publication.

५) Singh K.S. (2004). People of India-Maharashtra. Mumbai. Popular Publication.

६) अत्रे त्रि.ना. (१९१५). गाववाडा. पुणे. वरदा बुक पब्लिकेशन.

७) आगलावे, प्रदिप (२००७). सामाजिक संशोधन पध्दती. नागपुर. श्री साईनाथ प्रकाशन.

८) गजेंद्रगड व्ही.एन., मारुलकर व्ही.एस. (२०००). समकालीन भारतीय समाजशास्त्र. कोल्हापुर. फडके प्रकाशन.

९) घुगरे एस.बी. (१९९९). वीरशैव व इतर धर्म आणि समाज कोल्हापूर. साधना बुक स्टॉल.

१०) जोशी, महादेवशास्त्री (संपा) (१९४७). भारतीय संस्कृती कोश खंड - ३ पूणे. भारतीय संस्कृती कोष मंडळ.

११) देवगावंकर एस.जी. (२००९). महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती, नागपूर. श्री साईनाथ प्रकाशन.

मार्गदर्शक

डॉ.सिध्देश्वर रा.शेटकर
समाजशास्त्र विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक,
संजीवनी महाविद्यालय, चापोली
ता.चाकूर जि.लातूर

संशोधक

साखरे मनोज चंद्रकांत
एम.ए. (समाजशास्त्र,अर्थशास्त्र), बी.एड्.
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड
ता.मुखेड जि.नांदेड